❖ **स्थान :** शिराळा हे गाव सांगली जिल्ह्यातील तालुक्याचे मुख्य ठिकाण असून बत्तीस शिराळा या नावाने ओळखले जाते.
शिराळा हे गाव राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ वरील वाघवाडी इटकरे फाटा, पेठ नाक्यापासून १५ किलोमीटर अंतरावर आहे.

## ❖ भौगोलिक

शिराळा हे डोंगराळ भागात असून गावाची रचना डोंगर उतारावरची आहे. मुसळधार पाऊस, थंड आणि गुलाबी हिवाळा असे हवामान गावाचे आहे. शिराळा गावाला मोरणा धरणातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. गावाच्या मध्यातून एक मोठा ओढा जातो. त्याचा व बाहेरून येणाऱ्या मोरणा नदीचा संगम गोरक्षनाथांच्या मंदिराजवळ झालेला आहे.

## ❖ धार्मिक/ऐतिहासिक

शिराळा या गावाला धार्मिक अधिष्ठान प्राप्त झालेले आहे. गावात गणपती, गुरूदेव गोरक्षनाथ, नृसिंह, महादेव, मारुती, राम, लक्ष्मीनारायण, विठ्ठलरुक्मिणी व शनिदेव यांची मंदिरे आहेत. शिराळ्याचे ग्रामदैवत अंबामाता मंदिर आहे.

गावाला मोठा वारसा लाभला आहे. इथे भुईकोट किल्ला आहे. इ.स.१६४५ मध्ये समर्थ रामदासांनी स्थापन केलेले मारुती मंदिर गोरक्षनाथांनी इथे केलेले वास्तव्य, इथे असलेली पुरातन मंदिरे येथील वैशिष्ट्ये आहेत.

वर्षातून एक नागपंचमीची व दुसरी गोरक्षनाथांची यात्रा भरते. तसेच १२ वर्षातून एकदा कुंभमेळा महायात्रा भरते प्रत्येक एकादशीला एक छोटी यात्रा भरते. छत्रपती संभाजी महाराजांना गणोजी शिर्के आणि मुकर्रबखान यांना पकडलेले तेव्हा शिराळ्यात एक मुक्काम पडला होता. तेव्हा शिराळा गावच्या इनामदार आणि किल्लाचे आणि गावाचे दीक्षित यांनी त्यांना सोडवण्याचा एकमेव प्रयत्न केलेला होता. पण त्यात ते अयशस्वी झाले.

## ❖ 'बत्तीस शिराळा' नावाचा इतिहास

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात गोळा होत असलेल्या ३२ गावांच्या महसुलामुळे या गावाला पडलेले नाव म्हणजेच 'बत्तीस शिराळा'

## दृष्टिक्षेपात तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| • क्षेत्रफळ (चौ.कि.मी) | ६,३४,१७० | • महसूल मंडळे | ४ |
| • पुरूष लोकसंख्या | ७८,३५६ | • जि.प.सर्कल | ५ |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| • स्त्री लोकसंख्या | ७९,९४२ | • प्रा.आरोग्य केंद्रे | ७ |
| • गावांची संख्या | ९५ | • शाळांची संख्या | २०४ |
| • ग्रामपंचायती | ९२ | • महाविद्यालये | ५ |
| • पोलीस ठाणे | २ | | |

Scanned by CamScanner

## बिळाशीचे बंड

भारतमातेच्या रक्षणासाठी जीवाची बाजी लावणाऱ्या पाणीदार माणसांच्या बाणेदारपणाचा इतिहास म्हणजे बिळाशीचे बंड होय. १८५७ च्या उठावानंतर इंग्रजांच्या दडपशाहीची कोंडी यशस्वीपणे फोडण्याचा प्रयत्न झाला. तो शिराळा तालुक्यातील बिळाशीच्या बंडाच्या रुपाने बिळाशीच्या बंडाचा इतिहास शाईने लिहिलेला नाही तर तो लिहिला क्रांतीकारकांच्या रक्ताने ज्या घटनेची चर्चा केवळ हिंदुस्थानातच नव्हे तर ब्रिटिश, पार्लमेंटमध्ये ही झाली ती घटना म्हणजे बिळाशीचे बंड होय. महात्मा गांधींच्या ११ मागण्यांकडे इंग्रजांनी दुर्लक्ष केले. त्याला प्रतिउत्तर म्हणून संपूर्ण भारतभर सत्याग्रह केला गेला. १८ जुलै १९३० ला स्वातंत्र्याचा वणवा पेटवण्यासाठी बिळाशी पंचक्रोशीतले लोक जमले. आषाढ शुक्ल सप्तमीचा दिवस सत्याग्रहासाठी शुभमुहूर्त ठरला. राजूबाई पाटील, मैनाबाई यमगर, धोंडूबाई मस्करीन, राजीबाई कदम, इतर महिला, तरुण मुले, पांडु भोसले, गणू मुदगे, तुकाराम माळी, ईश्वरा धनगर, मुऱ्हा रोकडे, म्हांदू सस्कर या क्रांतिकारकांनी सत्याग्रहात सहभाग घेतला. देह रक्तात न्हाले. ध्वजस्तंभ इंग्रजांनी ताब्यात घेतला, मात्र अखेरपर्यंत त्यांच्या हाती लागू दिला नाही. पुढे तोच ध्वज प्रचितगडावर फडकविण्यात आला.

## शिराळ्याची नागपंचमी

नागपंचमीमुळे शिराळ्याचे नाव जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचले आहे. येथे होणाऱ्या जिवंत नागांच्या पूजेमुळे या गावाला नागभूमी म्हणून ओळखले जाते. गोरक्षनाथाचे काही काळ या गावापासून दोन किमी अंतरावर वास्तव्य होते. दर बारा वर्षांनी नाथ सांप्रदायिकांचा मेळावा येथे मोठ्या प्रमाणात भरतो. जिवंत नागपूजा व गोरक्षनाथ यांच्या परस्पर संबंधाची एक आख्यायिका आहे. पूर्वी गृहिणी मातीच्या नागाची पूजा करीत असल्यामुळे गोरक्षनाथांना भिक्षा वाढण्यास वेळ आला. तेव्हा गोरक्षनाथांनी बाराव्या शतकात शाबरी विद्येच्या जोरावर मातीच्या नागाला जिवंत केले व त्या जिवंत नागाची पूजा करण्यात आली. तेव्हापासून येथे जिवंत नागाची पूजा केली जाते.

करवीर निवासीनी अंबामाता मूळची शिराळ्याची आहे. अंबामाता हे ग्रामदैवत असून, नागपंचमीतून मानाची पालखी अंबामातेच्या दर्शनाला नेली जाते. दुपारी पालखी बरोबर जिवंत नागाची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात येत होती. नागदेवतेचे दर्शन घडावे नागाबद्दलच्या अंधश्रध्दा दूर व्हाव्यात हा त्यामागचा हेतू होता.

Scanned by CamScanner

परंतु वन्यजीव कायद्याच्या आधारे उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. त्यामुळे मिरवणूक बंद करण्यात आली. या जनहित याचिकेमुळे नागपंचमीवेळी धामीण नामक विनाविषारी सर्प पकडण्याची प्रथा बंद झाली.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प हा पश्चिम महाराष्ट्रातील पहिला, राज्यातील चौथा, तर देशातील सदतीसावा व्याघ्र प्रकल्प आहे. २०१० हे व्याघ्र वर्ष म्हणून साजरे होत असताना सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाची अधिसूचना जाहीर झाली. सह्याद्री व्याघ्र प्रकल्प ७४१.२२ कि.मी. क्षेत्रात कोयना अभयारण्यापासून चांदोली राष्ट्रीय उद्यानापर्यंत विस्तारला आहे. वनविभागाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वाघांच्या अवशेषासाठी असलेली वाढती मागणी व त्यांना मिळणारी किंमत यामुळे वाघांची संख्या घटली आहे. अशावेळी वाघांचे संरक्षण तसेच संवर्धन करून नवीन वाघांच्या वाढीच्या दृष्टीने पोषक असा अधिवास तयार करणाच्या हेतूने या प्रकल्पाची निर्मिती झाली आहे. शतकापूर्वी वाघांची संख्या ४० हजारांपेक्षा जास्त होती. सध्या ती १ हजार ४३१ एवढी आहे.

व्याघ्र प्रकल्पासाठी घोषित केलेले क्षेत्र हे सदाहरित जंगल असून ते दुर्गम व अतिउताराचे डोंगराळ व घनदाट आहे. या भागात सांबर, रानडुक्कर, लंगूर यांचा वावर आहे.

| व्याघ्र प्रकल्प | | | | |
|---|---|---|---|---|
| भाग/झोन | चांदोली राष्ट्रीय उद्यान | कोयना अभयारण्य | बफर झोन क्षेत्र | एकूण |
| बफर झोन | ० | ० | ८८५.५४ | ८८५.५४ |
| भागाक्षेत्र/कोअर झोन | २९२.५३ | ३९८.१०७ | ० | ६९०.६६७ |
| पर्यटकक्षेत्र | २५.१४ | २५.४४३ | ० | ५०.५८३ |
| एकूण | ३१७.६७ | ४२३.५५ | ८८५.५४ | १६२६.७६ |

❖ **प्राण्यांची संख्या**

१) सस्तन प्रजाती – २८ २) पक्ष प्रजाती – २७५ ३) सरपटणारे प्राणी – ५८
४) उभयचर प्राणी – ४२ ५) जलचर प्राणी – मोजदाद नाही

Scanned by CamScanner

### ❖ प्रकल्पाचे फायदे

१) सेंद्रीय शेती पद्धतीचा विकास
२) गावकऱ्यांशी चर्चेद्वारे प्रत्येक गावाचा स्वतंत्र विकास
३) आराखडा ग्रामसभेच्या मान्यतेने बनवता येईल.
४) पर्यटनाला चालना मिळण्यासाठी निवास, भोजन, वाहन, स्थानिक, करमणूक, वाटाड्या अशा विविध सुविधांचा विकास.
५) रेशीम उद्योग, मत्स्य व्यवसाय, मधुमक्षिका पालन, औषधी वनस्पती लागवड, विक्री, बांबू लागवड व त्यापासून वस्तू निर्मिती व विक्री स्थानिक गरजेनुसार आर्थिक साहाय्य व प्रशिक्षण.

## प्रचितगड

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यातील अनेक गडापैकी शिराळा या डोंगराळ तालुक्यातील प्रतिचगड हा किल्ला होय. सह्याद्रीच्या कुशीत चांदोली अभयारण्य परिसरातील सुमारे चार शतकापूर्वीचा हा ऐतिहासिक प्रचितगड सध्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. या किल्ल्याकडे जाणारा मार्ग हा चांदोली अभयारण्य कोअर झोनमधून जातो. तसेच गडावर जाण्यासाठीचा मार्ग हा अत्यंत खडतर आहे. नायरी मार्गे गडाकडे जाता येते. परंतु सदरमार्ग हा उंच दऱ्याखोऱ्यांचा आहे. तसेच अभयारण्यातून जाण्यास परवानगी नसल्याने या गडाकडे कोणीही फिरकत नाही.

या गडाच्या पूर्वेस – शृंगार गांव (संभाजी महाराजांनी कैद करण्यात आलेले गाव) दक्षिणेस नायरी गाव उत्तरेस शिराळा तालुका आहे.

वारणा नदीचा उगम याच गडावरच होतो. या गडावरून एकाचवेळी सांगली, सातारा, कोल्हापूर व कोकण या जिल्ह्यातील हालचालीवर लक्ष ठेवता येते वारणेच्या उगमावरील कंधारचा डोह पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे.

## चांदोली अभयारण्य

सह्याद्रीच्या कुशीत ३१७.६७ चौकिमी. क्षेत्रात विस्तारलेले चांदोली अभयारण्य म्हणजे पर्यटकांना मिळालेली पर्वणीच आहे. वारणा जलाशयाच्या चारी बाजूने सांगली, सातारा, कोल्हापूर व रत्नागिरी जिल्ह्यांच्या हद्दीत चांदोली अभयारण्य आहे. राज्यातील हे सर्वात मोठे निर्मनुष्य अभयारण्य असून १५ मे २००५ रोजी याला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा मिळाला आहे. या अभयारण्यातील २९५.५३ चौकिमी क्षेत्र शासनाने नुकतेच सह्याद्री व्याघ्र प्रकल्पासाठी निश्चित केले आहे. या अभयारण्यात

Scanned by CamScanner

सध्या ३२ बिबट्यांसह ३ वाघांचे अस्तित्व आहे. त्याबरोबरच सांबर अस्वल, रानकुत्रा, मोर, गरुड, घुबड, कोल्हा, डुक्कर असे विविध प्राणी व पक्षी या अभयारण्यात वास्तव्यास आहेत. या अभयारण्याचा चांगला विकास झाला आहे.

## चांदोली धरण

सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेला शिराळा तालुक्यातील वारणा नदीवरील चांदोली धरण सांगली व कोल्हापूर जिल्ह्यासह शिराळा व वाळवा तालुक्यांसाठी वरदान ठरला आहे. चांदोली धरण हे आशिया खंडातील क्रमांक दोनचे मातीचे धरण म्हणून प्रसिद्ध आहे.

याशिवाय कलावंतांची विहीर, कंधारचा धबधबा, शिवशाहीची साक्ष देणारा इतिहासकालीन प्रचितगड, भैरवगड, वाल्मिकी मंदीर झोलंबीचा सडा, रामनदी व प्राचीन मंदिरे आहेत. ते पाहण्यास परवानगी घ्यावी लागते. १ मे १९७७ रोजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्याहस्ते धरण बांधकामास प्रारंभ झाला. त्यामुळे या धरणाच्या जलाशयाला 'वसंतसागर' जलाशय असे नाव देण्यात आले. पुढे २० वर्षांनी १९९६-९७ मध्ये बांधकाम पूर्ण झाले. या क्षेत्रात पावसाचे प्रमाण ३१७ ते ६९८ सेमी इतके असून जलआयोगानुसार पाण्याची उपलब्धता १२८२.७०दलघमी आहे.चांदोली धरणाचे पाणलोट क्षेत्र ३०१ चौकिमी. असून लांबी १५८० मीटर आहे व नदीच्या पात्रापासून धरणाची उंची ७७ मीटर इतकी आहे. धरणाला वक्राकार आकाराचे चार दरवाजे आहेत. यास ओगी म्हणतात. इथूनच पाणी खाली पडते.

धरणाची पाणी साठवण क्षमता ३४.४० टी.एम.सी. असून नदी व धरणाच्या परिसराला कृष्णा खोरे असे नाव आहे. हे धरण चांदोली या ठिकाणी असल्यामुळे चांदोली धरण व वारणा नदीवर असल्यामुळे वारणा धरण असे संबोधले जाते. धरणाचा मुख्य उद्देश सिंचन व दुय्यम उद्देश वीजनिर्मिती आहे. येथे आठ मेगावॅट क्षमतेची दोन जनित्रे असून यातून १६ मेगावॅट वीज निर्मिती होते. प्रकल्पाचे बांधकाम सध्या पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. धरणातून दर २१ दिवसांनी कालव्यातून पाणी सोडले जाते. त्यामुळे शिराळा व वाळवा तालुके सुजलाम्-सुफलाम् झाले आहेत. वारणेच्या एकूण पाण्यापैकी ७ टी.एम.सी. पाणीसाठा डेडस्टॉक म्हणून धरणात राखून ठेवला जातो.

**१) फत्तूलाल अजित नायकवडी**

**जन्म** : १ जून १९५९

एम्.पी.एस्सी कडून

Scanned by CamScanner

* १९७९ – पोलीस उपनिरीक्षक पदी निवड
* १९७९–८० नाशिक येथे प्रशिक्षण
* १९८०–९० – अंमली पदार्थविरोधी विभाग, क्राईम ब्रँच येथे उत्कृष्ट काम याच काळात १९०० किलो चरस, १०४ किलो गर्द (हेरॉईन), ७५० किलो गांजा जप्त केला. केंद्र व राज्य शासनाकडून १,२५००० रुपयांचे बक्षीस व प्रशस्तीपत्रके देवून मुंबई व दिल्ली येथे सत्कार
* १९९१–९४ व्ही.आय.पी. सुरक्षेचे काम.
* १९९६–२००० राज्य गुन्हे अन्वेषण विभाग कोल्हापूर परिक्षेत्रात काम
* २००१ – पोलीस महासंचालक, मुंबई यांचेकडून गौरव. आजपर्यंत ३०० पेक्षा जास्त अ‍ॅवॉर्ड देवून गौरव

**२) हिंदकेसरी गणपतराव आंदळकर**

**जन्म** – १५ एप्रिल १९३५ – स्थळ पुणवत ता. शिराळा

* १९६० – हिंदकेसरी किताब प्राप्त
* १९६० – सर्वश्रेष्ठ, सौष्ठव पुरस्कार प्राप्त
* १९६२ – जकार्ता येथे एशियड सुपर हेवी गटात ग्रीकरोमन स्टाईलमध्ये सुवर्ण पदक व फ्री स्टाईलमध्ये रौप्यपदक प्राप्त
* १९६२ – अर्जुन पुरस्कार प्राप्त
* १९६४ – टोकियो येथे ऑलंपिकमध्ये भारतीय कुस्तीचे नेतृत्व व चौथ्या फेरीपर्यंत मजल
* १९८२ – महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त
* १९९० – महाराष्ट्र गौरव पुरस्कार
* १९९२ – फाय फाऊंडेशनकडून गौरव
* इतर कार्ये – महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष
* कोल्हापूर जिल्हा राष्ट्रीय तालीम संघाचे अध्यक्ष कोल्हापूरमधील तालीममध्ये प्रशिक्षक
* अनेक मल्लांना घडविले, रिळ येथे महाराष्ट्र हायस्कूलची स्थापना, गाव तेथे तालीम या योजनेसाठी अविरत कष्ट, महाराष्ट्र स्टेट कौन्सिलचे सदस्य म्हणून काम

Scanned by CamScanner

## जमीन

| | | | |
|---|---|---|---|
| • एकूण क्षेत्रफळ | ६४,७१७ हेक्टर | • कोरडवाहू क्षेत्र | २८,९५० |
| • लागवडीखालील क्षेत्र | ४७,७७८ | • पडीक क्षेत्र | ६,८१८ |
| • बागायत क्षेत्र | १०,११२ | • वन क्षेत्र | १३१२२ |

## पर्यटन

| | | | |
|---|---|---|---|
| • एकूण मंदिरे | ४४५ | • किल्ले | २ |
| • स्मारके | ४ | • डोंगर | २० |

## प्रमुख गोष्टी

- नद्या – २
- बाजारपेठा – ८
- मुख्य बाजारपेठा – ५
- पिके – भात, ऊस, मका, भुईमूग, ज्वारी
- जनावर बाजार – २

## शिराळ्याची इतर वैशिष्ट्ये

• चांदोली येथील वारणा धरण व अभयारण्य • चांदोली खु.प्रेक्षणीय कंधार डोह धबधबा • गिरजवडे येथील जोतिर्लिंग देवस्थान • शिराळा येथील श्री गोरखनाथ मंदिर

Scanned by CamScanner